दैनिक

# मुक्तागिरी

थेट संवाद आपल्याशी...!

शनिवार, दि. २३ ऑक्टोबर २०२१

## आत्ममग्न न होता मैत्रीभावना वाढवणे ही जगाची गरज : डॉ. सुभाष वाघमारे

### गोडोलीतपंचशील प्रसारक मंडळाचे'वर्षावास समाप्ती' या मंगलमय कार्यक्रमाचे आयोजन




पंचशील प्रसारक मंडळ गोडोली आयोजित 'वर्षावास समाप्ती 'कार्यक्रमात धम्मविषयक विचार व्यक्त करताना डॉ.सुभाष वाघमारे, बसलेले डावीकडून समाजकल्याण विभागाचे सहा. आयुक्त आय.नितीन उबाळे, डॉ.सुवर्णा यादव, धम्माचारी संघादित्य, दलितमित्र आयु.वामनराव मस्के.

सातारा : 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय यासाठी धम्माचे ज्ञान देणारा तथागत गौतम बुद्धांचा संघ सर्वत्र चांगले विचार देत राहिला. मन चांगले ठेवावे, सुयोग्य, सरळ, सुभाषी, मृदू स्वभावी असावे, निराभिमानी, संतुष्ट राहावे. साधेपणाने रहावे, मन शांत ठेवावे, काया, वाचा, मनाने देखील दुराचरण करू नये. सर्व प्राणीमात्र सुखी राहू दे, सर्वांचे कल्याण होऊ दे असा सदुपदेश देत राहिला. सर्व मनुष्यमात्र नीतिमान, निर्भय, सुखी रहावे हा विचार देत राहिला. आज हे जग आत्ममग्न होत आहे. नाती तुटू लागली आहेत. हिंसा वाढली आहे. म्हणून आत्ममग्न न होता मैत्री भावना वाढवणे ही जगाची गरज बनली आहे, असे मत छत्रपती शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले. ते गोडोली येथे पंचशील प्रसारक मंडळ यांनी जेतवन बुद्धविहार प्रांगणात आयोजित केलेल्या वर्षावास समाप्ती कार्यक्रमातबोलत होते. अध्यक्षस्थानी ज्रेष्ठ मार्गदर्शक दलितमित्र आयु.वामनराव मस्के हे होते. समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त श्री. नितीन उबाळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. सुवर्णा यादव, धम्मचारी संघादित्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

वर्षावासाची माहिती देताना डॉ. वाघमारे पुढे म्हणाले की 'आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या काळात पाऊस भरपूर पडत असे. याच काळाला वर्षावास म्हणतात. या काळात भिक्खू विहारात राहून परिसरातील लोकांना धम्म ज्ञान देत. उपासक आणि भिक्खू यांचा सहवास दीर्घकाळ होत असल्याने जीवन कसे जगावे याचे चांगले मार्गदर्शन मिळत असे. वर्षावास संपल्यावर चारिका सुरु होई.जेतवन, वैशाली, राजगृह, श्रावस्ती येथील विहारात वर्षावासात संघ राहिल्याचे दिसते. सम्राट अशोक यांनी कलिंगचे युद्ध जिंकले. पण युद्धात एक लाख सैन्य मेले. युद्धानंतरची विदारकता पाहून त्याचे मन द्रवले. त्यातूनच पुढे अहिंसक अशा धम्माचा प्रसार अशोकाने केला.लोकांवरत्याचे खूप प्रेम होते. ८४००० स्तूप त्याने बांधले. विहार बनविले. लुंबिनी, बोधगया, सारनाथ, कुशीनगर येथे धम्माची नितीतत्वे शिलालेखात कोरली. एका शिलालेखात सम्राट अशोक म्हणतो की 'मी वटवृक्ष लावले, आम्रवृक्ष लावले, दर दोन मैलावर विहिरी खोदल्या, धर्मशाळा, जल हे सारे मनुष्य आणि पशूंच्या सुखासाठी केले' इतर शिलालेखात देखील अशीच तत्वे आढळतात. ''प्रेमाचा विजय हाच स्थायी विजय''' ''क्रोध, मान, इर्षा, अहंकार या दुर्गुणापासून दूर रहा '''परोपकार हाच धम्म 'अशी अनेक धम्म तत्वे त्याने कोरली. आपण या काळात देखील नितीमत्ता चांगली ठेवून धम्माचरण केले पाहिजे असे ते म्हणाले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना वर्षावासबद्दल माहिती देत समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त आयु.नितीन उबाळे म्हणाले की ''कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येऊन प्रेम जपणे आवश्यक आहे. पंचशील प्रसारक मंडळाने वर्षावास समाप्ती कार्यक्रम परंपरा जतन केली. मात्र, सध्याच्या काळात कोणती आव्हाने आहेत याचे चिंतन करावे. समाजकल्याण तर्फे चांगल्या कामासाठी मदत करण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. प्रा. डॉ. सुवर्णा यादव यांनी तथागताच्या विचारांची सर्वांना गरज आहे, असे सांगून भिक्खूचे धम्म प्रसाराचे कार्य महत्वाचे असल्याचे सांगितले. गौतम बुद्धांनी बुद्ध धम्मात स्त्रियांना सहभागी केल्याचे त्यांनी सांगितले. धम्मचारी संघादित्य यांनी विहार हे विकासाचे साधन आहे. ध्यान धारणा केल्याने मनुष्य प्रगल्भ बनतो. धम्म शिबिरात प्रत्येक घरातील किमान एकाने सहभागी व्हावे असे आवाहनं त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात आयु.वामनराव मस्के म्हणाले की पंचशील प्रसारक मंडळ गोडोली हे साताऱ्यातील आंबेडकर चळवळीला सहाय्यभूत ठरलेले असून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात ही येथून झाल्याचे ते म्हणाले.

या वर्षावास समाप्ती कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती सातारा यांनी घेतलेल्या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक मिळविलेल्या सृष्टी सतीश मस्के, आम्रपाली सतीश मस्के, गार्गी प्रशांत मस्के, दक्ष संजय मस्के, यांना प्रमाणपत्र व फुले देऊन सत्कार करण्यात आला. पंचशील प्रसारक मंडळ व माता रमाई महिला मंडळ गोडोली यांच्यातर्फे भोजनदान देण्यात आले. तर आयु. संभाजी शंकर मस्के यांनी खीरदान केले. प्रारंभी आयु. अरुणा रमेश मस्के व आयु. शोभा वसंत मस्के यांनी सामुहिक बुद्ध वंदना घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. सुरेखा जालिंदर मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.रमेश मस्के यांनी मानले. या कार्यक्रमाचे संयोजन पंचशील प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक व संयोजक प्रा. रमेश मस्के, आयु, दता मस्के.आयु. सागर मस्के यांनी केले. या कार्यक्रमासपंचायत समिती सदस्य आयु.प्रवीण धस्के,आयु.चंद्रकांत चव्हाण, आयु. सोरटे सर, डॉ. गोरख बनसोडे इत्यादी सामाजिक कार्यकर्ते व धम्मजिज्ञासू बांधव उपस्थित होते.